# रे.दि.मु.नं. ५४/२०१० मधील नि.क्र. १०४ खालील आदेश

( मष्णा वि. शकुंतला)

1. प्रतिवादी क्र. १ ने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरूस्ती होवून परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

2. प्रतिवादी क्र. १ चे थोडक्यात कथन असे की, तीने जवाबदावा दिलेला आहे परंतू जवाबदाव्यामध्ये महत्वाची माहिती लिहीण्याचे राहून गेले आहे. जे तिला नूकसान करणारे आहे. त्यामूळे प्रतिवादी क्र. १ जवाबदाव्यातील परिच्छेद क्र. ४ मधील पेज क्र. ३ वरील ओळ क्र. २ वरील बेकायदेशिर पुत्र या ऐवजी अनौरस पुत्र तसेच रामराव कुंडगिर १९८७ साली व सिताबाई २००६ साली मयत झाली हे खोटे आहे या ऐवजी ते दोघे अनुक्रमे ३१–०१–१९९७ व दिनांक १९–११–२००६ रोजी मयत झाले आहेत हे खरे आहे असा मजकूर समाविष्ट करण्याची विनंती केली.

3. तसेच जवाबदाव्यातील परिच्छेद क्र. ५ मध्ये पेज क्र. ४ वर वरुन ओळ क्र. ५ मध्ये याचा उल्लेख नाही या शब्दानंतर हक्कसोड पत्रातील नमूद घर क्र. ७८ साईज ४० बाय ४६ हे दिनांक ११–१२–१९९४ रोजी मयत रामराव उर्फ रामचंद्र, मष्णा कुंडगिर यांनी बाबा लक्ष्मणराव देवकते यास रजिष्टर खरेदीखत डे.बु.क्र. २७०३/१९८४ दिनांक ११.१२.१९८४ रोजी रक्कम रुपये २०००/– च्या मोबदल्यात पुर्वीच विक्री केली आहे. त्या खरेदीखतावेळी साक्षीदार व हक्कसोडपत्रावर साक्षीदार म्हणून जनार्धन काशिराम नरवटे यांनी सही केली हा मजकूर वाढविण्याची विनंती केली. तसेच सदर अर्जातील परिच्छेद क्र. ५ नुसार तीच्या जवाबदाव्यामध्ये परिच्छेद क्र. ६/१ हा नविन परिच्छेद वाढविण्याची विनंती केली.

4. वादीने सदर अर्जावरील म्हणणे कथन करतांना हरकत घेतली की, सदर दावा जुना असून वादीचा पुरावा संपलेला आहे. आणि सदया प्रतिवादीच्या पुराव्याकरीता दावा प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत सदरचा अर्ज कायदेशिर रित्या योग्य नसल्याने अशी दुरुस्ती मान्य करता येणार नाही. तसेच सदर दुरुस्तीमूळे दाव्याचे स्वरुप बदलत असल्याने सदर दुरुस्ती नाकारण्याची विनंती केली.

5. अर्ज वाचला. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दावा व सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरूध्द निरंतर मनाई हुकूम मिळण्याबाबत केला आहे. वादीचा पुरावा संपलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ने तिचा लेखी जवाब दिनांक १८.०६.२०१० रोजी दाखल केलेला आहे. वादीने जवाबदाव्यातील दुरुस्तीमध्ये केवळ बेकायदेशिर पुत्र ऐवजी अनौरस पुत्र असा बदल मागितला असून रामराव कुंडगिर व सिताबाई यांच्या मृत्यूचा दिनांक स्पष्टीकरणाकरीता सांगितला आहे. त्यांच्या मृत्यूची बाब प्रतिवादी क्र. १ च्या जवाबदाव्यामध्ये नमूद असून वादीने सुध्दा परिच्छेद क्र. ३ मध्ये सदर व्यक्ती मयत झाल्याचे म्हटलेले आहे.

6. तसेच प्रतिवादी क्र. १ च्या जवाबदाव्यामध्ये हक्कसोड पत्रातील नमूद घराचे क्षेत्रफळ नमूद करुन सदर घर दिनांक ११.१२.२०१४ रोजी मयत रामराव कुंडगिर यांनी बाबाराव लक्ष्मण देवकत्ते यांना नोंदणीकृत खरेदीखताने २००० रुपयाच्या मोबदल्यात पुर्वी विक्री केल्याचे व त्यावेळी साक्षीदार म्हणून जनार्धन काशिराम नरवटे हे होते असा मजकूर वाढविण्याची विनंती केली. वादीचे वादपत्र व प्रतिवादी क्र. १ च्या जवाबदाव्यात हक्कसोडपत्राचा उल्लेख असून वादीच्या वादपत्रात घराचा सुध्दा उल्लेख आहे. वादीच्या वादपत्रात परिच्छेद क्र. ४ मध्ये तिसऱ्या ओळीमध्ये रामराव कुंडगिर यांचे मौजे मष्णेरवाडी येथे घर होते असा उल्लेख आहे. सदर वाद मिळकत पैकी प्रतिवादी क्र. २ यांनी त्याच्या वाटणी हिस्सेच्या मोबदल्यात रक्कम घेवून हक्कसोडपत्र करुन दिल्याचे नमूद आहे. परंतू हक्कसोडपत्र कधी, केंव्हा, कोणासमक्ष झाले याचा मजकूर नमूद नाही. प्रतिवादी क्र. १ चा वरील मजकूर हक्कसोडपत्रातील घराशी संबंधित आहे.

7. तसेच प्रतिवादी क्र. १ चा प्रस्तावित वाढीव परिच्छेद क्र. ६/१ हा वादीच्या वादपत्रातील परिच्छेद क्र. ४ व ५ शी संबंधीत आहे. तसेच वादीच्या वादपत्रातील परिच्छेद क्र. ४ व ५ मधील तथ्ये प्रतिवादी क्र. १ ने जवाबदाव्यातील परिच्छेद क्र. ५ व ६ मध्ये नाकारलेले आहे. त्यामूळे प्रस्तावित वाढीव परिच्छेद क्र. ६/१ हा स्पष्टीकरण म्हणून वाढविता येईल. तसेच प्रतिवादी क्र. १ ने कथन केलेल्या वरील दुरुस्तीच्या बाबी या प्रतिवादी क्र. १ ला माहित नव्हत्या. संपरिक्षेदरम्यान सदर बाबी तिला कळाल्याने तसेच त्या तीचे वादपत्र नि.क्र. १६ सोबत सुसंगत असल्याने दाव्याचे कुठलेही स्वरुप बदलत नाही.

8. दाव्याचे स्वरुप बघता तसेच वादी व प्रतिवादींमध्ये नाते संबंध आणि प्रतिवादी क्र. १ ला दावा प्रलंबीत असतांना वरील बाबी उघडकीस आल्याची बाब बघता त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ जवाबदाव्यामध्ये दुरूस्ती करून त्या अनुषंगाने दाद मागत असल्याने वाद विषयाचे गुणदोषावर अंतिम निराकरण करण्याकरिता सदरच्या दुरूस्त्या मंजूर होणे न्यायाचे व गरजेचे आहे. दुरूस्त दावेस सविस्तर कैफियत देवून म्हणणे मांडणेची संधी निश्चितच वादींना मिळणार आहे. अद्याप दाव्यात प्रतिवादीचा पुरावा सुरु झालेला नाही. त्यामूळे सदर बाबींवर वादी त्याचा पुरावा देवू शकतो. तसेच प्रतिवादी क्र. १ ने मागितलेल्या दुरूस्त्या या स्पष्टीकरणात्मक स्वरूपाच्या आहेत. वाद विषयांची अनेकता व गुंतागुंत टाळण्यासाठी देखील दुरूस्त्या मंजूर होणे आवश्यक आहे. दावा प्रलंबीत असताना घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने दुरूस्त्या मागितल्या असल्याने वरील सर्व कारणांचा विचार करुन माझे असे मत आहे की, प्रतिवादी क्र. १ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. वादीला होत असलेल्या विलंबा करीता प्रतिवादी क्र. १ तर्फे उचित खर्चाची तजविज करुन सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी झालेल्या विलंबाकरीता वादीला रुपये ५०० खर्च अदा करावी.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुत अर्जान्वये मागितलेल्या दुरूस्त्या मुळ दाव्यामध्ये वैधानिक कालावधीमध्ये करुन घेण्याचे त्यांना निर्देशीत करण्यात येत आहे.

स्थळ– चाकूर **(योगेश डी. कोईनकर)**
दिनांक– १९/०१/२०१८ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, चाकूर